मूल्य १० रुपये

न मातुः पर दैवतम् ।

। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।




# मातृसेवा

वर्ष ५७ वे २४ जुलै २०२३ अंक ७



# मातृसेवा

कै. कमलाताई होस्पेट : संघसंस्थापिका
कै. प्रमिला दाणी : आद्य संपादिका

स्थायी समिती (२०२१-२०२८)

- ❒ डॉ. अरुणा बाभुळकर : अध्यक्ष
- ❒ डॉ. लता देशमुख : सचिव
- ❒ श्रीमती शीला राव : संपादिका
- ❒ श्रीमती ममता चिंचवडकर
- ❒ श्रीमती सुरेखा देवघरे
- ❒ सौ. यश:श्री वाघ
- ❒ श्रीमती शोभा पारळकर
- ❒ श्रीमती वनिता पाटील : आमंत्रक

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| संपादकीय | – शीला राव | ३ |
| माझे मोहनी आबा | –प्राची माहुरकर | ४ |
| ठसा – दिवाकर मोहनी | – महेश उपदेव | ६ |
| स्मृतिवंद्य दिवाकर पु. मोहनी | – रवींद्र देवघरे | ७ |
| माझी गच्चीवरील बाग | – संजीवनी निमखेडकर | ८ |
| झलकारी बाई | – कुंदा वाडेकर | ९ |
| पेंग्विन परेड फिलीप आयलँड मेलबोर्न | – मीना शेलगांवकर | १० |
| ऑनर किलिंग ची विकृती | – डॉ. सुषमा भोसले | १४ |
| आनंदी जीवनाचा मंत्र | – सौजन्य – रागिणी बक्षी | १७ |
| स्मिता मांजरे | – डॉ. रमा दत्तात्रय गर्गे | १७ |
| भूलभूलैय्या | – सौजन्य – महती | २१ |
| झाडाची मुळे हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहेत | – शोभा | २३ |
| दिवाकरजी मोहनी | – प्रणव प्रियदर्शी | २३ |
| Very Beautifully written, Salt -VS- Rice... | – शीला | २५ |
| **शाखावृत्त** | | |
| मातृ सेवा संघ – आंतरराष्ट्रीय योगा दिवस | – कांचन बान्ते | २७ |
| कार्यक्रमाची त्रिवेणी | – डॉ. गीता व्ही दिक्षित | २७ |

**कृपया नोंद घ्यावी, वार्षिक वर्गणी रु. २०० आहे लवकरात लवकर वर्गणी पाठवावी.**

कार्यालय : मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर – १० फोन : २५२२३९३, २५२२२८७, २५२३५९(६२)
Website : http:/www.mss.org.in Email : matrusewa@yahoo.com

**अंक मिळत नसल्यास जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये तक्रार करावी.**

# संपादकीय

**– शीला राव**

**जातस्य हि ध्रुवो मृत्युः।**

जो जन्मला त्याचे मरण अटळ आहे! हे आपल्याला विदितच आहे. जन्म आणि मरण ह्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील दोन घटना किती परस्पर विरोधी आहेत नाही? जन्माची घटना ही अत्यंत आनंदाने भरलेली तर मृत्यूची घटना अतोनात दुःखाने! पण हे टाळणे शक्यच नाही. आपल्याला हे स्वीकारावेच लागते. गेलेल्या माणसाचे मोठेपण, कर्तृत्व आठवून आणि त्याचे स्मरण करूनच आपल्याला समाधान मानावे लागते!

नुकतेच दिवाकर मोहनी यांचे निधन झाले. ते कमलाताई होस्पेट ह्यांच्या परिवारातील होते. मातृ सेवा संघाचे ज्येष्ठ सल्लागार ही होते, तसेच आपल्या मातृसेवा मासिकाशी त्यांचा निकटचा संबंध होता. ते स्वतः कुशल लेखक असल्यामुळे आणि 'आजचा सुधारक' मासिकाचे संपादक असल्यामुळे त्यांचा सल्ला आणि सूचना फारच महत्त्वाच्या असत. त्यांच्या विस्तृत परिवाराविषयी आणि आकर्षक व्यक्तिमत्त्वाविषयी ह्या आपल्या अंकात आपल्याला समजेलच! समाजाच्या विविध स्तरांमधून, अनेक विषयातील धुरीणांना त्यांचे विचार समजून घेण्याची आवश्यकता वाटत होती. लहान-थोरांना त्यांच्याकडून शिकावेसे वाटत होते. आणि त्यांनी त्याचा आपल्या आयुष्यात पुढे येण्यासाठी फायदाही करून घेतला. अखंड अनेक विषयांचे चिंतन, त्याबद्दल स्वतःचे निष्कर्ष आणि नंतर त्याचे अत्यंत प्रभावी आपले शुद्ध रीतीने केलेले प्रतिपादन हे दिवाकरांचे विशेष वैशिष्ट्य होते. स्वतः मुद्रक असल्यामुळे ते भाषेच्या शुद्धतेकडे जास्त लक्ष देऊ लागले आणि स्वत: 'भाषाव्रती' झाले; आणि त्यांची 'माय मराठी....' आणि 'शुद्धलेखनाचे तत्त्वज्ञान' ही दोन पुस्तके जगासमोर आली. त्याची दखल मरठी-साहित्य महामंडळाने त्यांना 'भाषाव्रती' पुरस्कार देऊन घेतली.

दिवाकरांनी स्वत: पारंपरिक शालेय शिक्षण घेतले नव्हते लहानपणी! त्यामुळेच कदाचित त्यांना आपल्या तीव्र आणि चौकस बुद्धीने प्रत्येक विषयाबद्दल नीट अभ्यास करून, तो नीट समजून घेण्याची सवय लागली आणि त्याबद्दल ऊहापोह करण्याची प्रवृत्ति निर्माण झाली. त्यांच्या वागण्यातील आणि बोलाण्यातील अत्यंत साधेपणामुळे त्यांचा मित्र परिवार आणि शिष्य परिवार मोठा होता. ते खूप जणांचे 'आबा' होते. त्यांच्या ठिकाणी सामान्यांना देखील वस्तुपाठ समजावून देऊन त्यांना समर्थ करण्याची हातोटी आणि कौशल्य होते. म्हणून मी म्हणते –

**कुशलो एव जानाति, कथं कार्यं तु सिध्यते ।**
**कठोरात् प्रस्तरादेव, रम्या मूर्तिः प्रवर्तते ।।**

**विनम्र अभिवादन!**

---

# माझे मोहनी आबा

''जन्मजात दुःखे नसती, दोष समस्तांचा....
पराधीन नाही जगती पुत्र मानवाचा.... '''

असे ठासून सांगणारे आणि पुढे जोरात 'हम्म्म' असे उद्गार काढून कळले का प्राचीबाई असे म्हणणारे माझे गोंडस, तेजस्वी, देखणे, प्रेमळ, प्रखर बुद्धिमान आबा गेले. तसे पाहू गेल्यास आबांना अनेक मानसकन्या आणि मानसपुत्र असतील... पण तरीही प्रत्येकाला ते आपलेच आहेत असा विश्वास वाटण्याइतपत आबांनी सगळ्यांना जीव लावला होता. त्यांच्या बुद्धिमत्तेचे तसूभरही दडपण ते कोणावर येऊ देत नसत. ''शाळेत न गेल्यामुळे मी शिकू शकलो''असे मिश्कीलपणे डोळे मिचकावत सांगायचे ते. मी तर त्यांना गमतीत तुम्ही हॅरी पॉटर सारखे दिसता म्हणत असे. गोरे गोरे, विस्कटलेले केस, सतत शोध घेणारी चौकस नजर आणि प्रेमळ हसू. आमच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर असे त्यांच्याकडे. अगदी वन स्टॉप सोल्युशन म्हणतात ना तसे!

२०१४ मध्ये पहिल्यांदा मी मोहनी आबांकडे गेले. श्री. अ. दाभोळकरांचे एक सहकारी काही कामाने नागपुरात आले होते व शेतीक्षेत्रात काम करणाऱ्यांना भेटत होते. तेव्हा काही मंडळी त्यांना मोहनी निवासात भेटणार होती. त्यानिमित्ताने मी पहिल्यांदा त्या घरात पाय ठेवला होता. मी सगळ्यात आधी जाऊन पोचले होते त्यामुळे थोडा वेळ होता. म्हणून आबांनी माझी चौकशी केली व थोडक्यात माझ्या कामाविषयी समजून घेतलं. त्या दिवसानंतर आबा स्वतः माझ्या विषयासंबंधी काहीतरी वैचारिक प्रश्न घेऊन फोन करत असत व मग आमची त्यावर चर्चा होत असे. अतिशय स्वच्छ, मोकळ्या मनाने ते माझी मतं विचारून घेत असत. यातून आबांकडे जाऊन जो चर्चांचा रतीब पडू लागला त्याचा सिलसिला अगदी अलीकडे त्यांना अजिबात ऐकू येईनासे होईपर्यंत टिकून होता. तोपर्यंत आजचा सुधारक, आबांचे विवेकवादी विचार, त्यांचे लिखाण हे काहीच माहित नसलेली मी आबांशी अनेक विषयांवर व्यवस्थित वादविवाद करत असे. मी जी वेळ सांगितली असेल त्या वेळी ते स्वतः दोन मजले जिन्याने उतरून खाली माझी वाट बघत उभे असत. मी शंकरनगरहून पायी आले की गाडीने हे पण लक्ष ठेवायचे असायचे त्यांना. मग पहिली सलामी त्यावर झडत असे. त्यानंतर वर जाऊन वाचन, चर्चा, थोडा खाऊ असे सगळे यथासांग पार पडले की आम्ही खुश होऊन घरी परतत असू.

अगदी दुसऱ्या तिसऱ्या भेटीतच त्यांनी सांगून टाकले होते मला आबा म्हणायचे म्हणून. मी कधीच माझ्या कोणत्याच आजोबांना बघितले नव्हते. एव्हढेच कशाला माझे वडील देखील माझ्या नवव्या वर्षी वारले. त्यामुळे एकंदरीतच पितृसुखाला

मी पारखी होते. पण आबा म्हणायचे मीच तुला वडिलांच्या जागी आहे असे समज. आणि मग अस्मादिक रडू लागायचे. आपल्यावर देखील कोणी प्रेम करते व आपल्या येण्याने कोणाला आनंद होतो हे इतके मोठे सुख होते की आबांकडे वारंवार जावेसे वाटायचे. पुढे एखाद वर्षातच शेतीवरून आमचे विषय निसर्ग, रोजगार, विवेकवाद, लैंगिकता, इकॉनॉमिक्स, तुकारामाची गाथा इत्यादींकडे वळले. आणि मला आबांचा आवाका अचंबित करू लागला. त्यातून मग आमच्या या चर्चांमध्ये इतरांचाही सहभाग असावा असे मी सुचवले आणि आमचे एक मंडळच तयार झाले. त्यात आजी, आबा, मी, प्रद्युम्न, अतुल, प्राजक्ता, माधुरी, भरत आणि स्वाती असे जमत असू. 'आजचा सुधारक'चे लेख वाचून त्यावर चर्चा करणे आणि विषय खोलात जाऊन समजून घेणे हे त्यातून सुरू झाले. धर्म आणि विवेकवाद, खादीतून न होऊ शकणारे स्वावलंबन, स्त्री/पुरुष लैंगिक समानता, परस्परावलंबन, पूर्वसंस्कार, रोजगार ही कृत्रिम व फसवी संकल्पना इत्यादी इत्यादी वर प्रचंड चर्चा घडत असे. मग भाषेचे वर्ग सुरू झाले. लेखन हे वाचकांच्या सोयीचे हवे लेखकाच्या नाही हा अगदी मूलभूत विचार सोदाहरण आबांनी मांडला होता. त्यांचे ''शुद्धलेखनाचे तत्त्वज्ञान'' व ''माय मराठी-कशी लिहावी व कशी वाचावी'' ही पुस्तके मराठी शिकणाऱ्यांसाठी फार उपयुक्त व मौलिक देण आहे. आमच्या चर्चेत त्यांनी तयार केलेल्या अनेक व्याख्या येत असत. जसे की : संपन्नता म्हणजे काय? तर संपन्नता म्हणजे कमीतकमी श्रमात नित्याच्या गरज भागवता येण्याची क्षमता. ज्यामुळे १. आयुष्यात निश्चिन्तता येते, २. दुसऱ्याविषयीचा मत्सर कमी होतो व ३. ललित कलांचा आस्वाद घेता व देता येण्याची परिस्थिती निर्माण होते. त्याही पुढे जाऊन मग ते सांगत... संपन्नतेचा अभाव म्हणजे दारिद्र्य... आणि दारिद्र्य म्हणजे चिंताग्रस्तता व कष्ट. माणसाचे शिक्षण सहासप्रवृत्तीने होते पण ते विवेकपूर्ण व्हावे व आत्मोन्नतीसाठी असावे हा शिक्षणाचा उद्देश असावा असे ते म्हणत असत. कधी म्हणत Intelligent collective efforts for more and more production is capital.

कधी म्हणत विज्ञानाने देवाचे अस्तित्व सिद्ध झाले नाही पण सृष्टीची गुंतागुंत मात्र सिद्ध झाली. मग सृष्टी या शब्दाच्या व्युत्पत्तीकडे आमचे लक्ष वेधत असत. सृष्टी हा शब्द सृज् धातूपासून तयार झालेला असून त्याचा अर्थच मुळी निर्माण असून सृष्ट म्हणजे निर्माण झालेलं इतकं सगळं नुसते सांगून मोकळे होत नसत तर लगेच कुठलासा कोष काढून अचूक ते पान उघडून आम्हाला ते बघायला व वाचायला लावत असत. त्यांच्याच लेखामध्ये अनेक नवीन शब्द आम्हाला ऐकायला मिळायचे. एकदा 'परिष्करण' हा शब्द आला. आता याचा अर्थ काय आबा असे विचारतात आबांची कळी खुलली. लगेच त्याचा अर्थ सांगून वर शब्दकोश उघडून त्यावर चर्चा केल्यावरच वाचनाची गाडी पुढे सरकली. विवेकवादी होणे म्हणजे

काय, सामूहिक शेती असावी काय, आदर्श गावाची रूपरेखा, स्त्रीचे लैंगिक स्वातंत्र्य, आजचा सुधारकचे digitization ची तयारी व रीतसर उद्घाटन, 'जल थल मल' पुस्तकाचा तुमच्या घरी बसून केलेला अनुवाद व त्यावरील चर्चा, तुमचे जीवनानुभव... किती किती देऊन गेलात तुम्ही आबा. गेल्यावरही तुमचा देह वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी दान केलात. सगळ्यांनी तुमच्यासोबत शिकत राहावं ही तुमची असोशी इथेही कायम ठेवलीत. आता त्या तरुणांना पाहून डोळे मिचकावत काही प्रश्न विचारू नका म्हणजे मिळवली. love you आबा ....

**तुमचीच अभ्यासात कच्ची – प्राची माहुरकर**

------------------------------------------

## ठसा – दिवाकर मोहनी

**– महेश उपदेव**

विदर्भातील ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत आणि भाषा व लिपी तज्ज्ञ. साहित्यिक दिवाकर मोहनी हे सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्याची विदर्भात ओळख होती. खादीचा सदरा खादीचे धोतर, खांद्यावर शबनम बॅग ही त्यांची ओळख होती. त्यांच्या या झोळीत मौल्यवान विचार दडलेले असायचे. दांडगे वाचन असल्यामुळे कोणत्याही विषयावर ते चर्चा करायला तयार असायचे. आपल्या मराठी मायबोली मराठीवर त्यांचे विशेष प्रेम होते.

मोहनी यांनी अखेरपर्यंत आपली चौकस बुद्धी आणि शिकण्याची नवी आस कायम राखली होती. मोहनी यांचा जन्म १० नोव्हेंबर १९३१ रोजी नागपुरात गांधीवादी कुटुंबात झाला. मराठीतील बुद्धिवादाच्या 'आजचा सुधारक' मासिकाचे माजी संपादकही होते. स्त्री-स्वातंत्र्य, धर्म, संपत्तीचे स्वरूप यांसह विविध विषयांवर त्यांनी तर्कसंगत आणि नवीन वैचारिक तत्त्वज्ञान मांडले. त्यांचे देवनागरी लिपीवरील 'मायमराठी.. कशी लिहावी...कशी वाचावी' हे पुस्तक लिपीवरील संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. मोहनी हे भाषा आणि शुद्धलेखनाबद्दल कायम आग्रही होते लिखाण उत्तम असले पाहिजे आणि भाषा वाचणाऱ्याला सोयीची असावी असा त्यांचा आग्रह होता. नागपूर विद्यापीठाच्या जनसंवाद विभागात ते विद्यार्थ्यांना ग्राफिक आर्ट हा विषय शिकवायचे.

मोहनी हे सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व होते. कमलाताई होस्पेट या त्यांच्या आत्या होत्या. त्यांनी मातृसेवा संघ स्थापन केला. नागपूरच्या त्या पहिल्या पद्मश्री पुरस्कारप्राप्त कार्यकर्त्या होत्या. दिवाकरराव यांचे काका हरिभाऊ मोहनी महात्मा गांधी यांच्या दांडी यात्रेतील सहकारी होते. दिवाकरराव यांचे आचार्य अत्रे, आचार्य विनोबा भावे यांच्याशी जवळचे संबंध होते. त्यामुळे ते गांधीवादी विचार घेऊनच जगले. मराठी भाषेत त्यांचे मोठे योगदान होते. भाषेकरिता अनेक संशोधने

केली. बहुभाषिक होते, बंगाली भाषा बोलता व लिहिता येत होती. त्यांचे विविध भाषांवरही प्रभुत्व होते. त्यांनी विवेकवादाची नियतकालिके चालविली वैचारिक मेंढ्या हाकायचे काम त्यांनी केले. खादीवर त्यांचे विशेष प्रेम होते. त्यांच्या पत्नी इंदिरा खादीची साडी परिधान करायच्या.

'आजचा सुधारक' या विवेकवादी नियतकालिकाचे ते संपादक व प्रकाशक होते. त्यांनी स्त्री स्वातंत्र्य, धर्म, संपत्तीचे मोल आदी विषयावर विवेकवादी अंगाने लेखन केले. देवनागरी लिपीवरील त्यांचे 'मायमराठी कशी लिहावी...कशी वाचावी' हे पुस्तक संशोधनासाठी तसेच मराठी भाषेच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे मानले जाते. त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या 'भाषाव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

नवीन विषयाबद्दलचे कुतूहल त्यांना असे ते अतिशय रॅशनल विचार करत. समाजात स्त्रीवर होणारे अत्याचार त्यांना अस्वस्थ करीत. अलीकडे आजारी असतानासुद्धा सध्या देशात राज्यात काय सुरू आहे यावर त्यांचे लक्ष होते.

ज्येष्ठ विधिज्ञ के. ए. देशपांडे यांच्याशी त्यांचे घनिष्ठ कौटुंबिक संबंध होते. त्यांच्या विनंतीवरून सुप्रसिद्ध कामगार नेते आणि राज्यसभा सदस्य पु. य. देशपांडे लिखित 'अमृतानुभव रसरहस्य' या संत ज्ञानेश्वरांच्या भाष्यावर लेखन केलेल्या, पाच खंडात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाचे पुन:प्रकाशन करण्यात दिवाकररावांनी मोलाचे सहकार्य केले. हा ग्रंथ मुद्रित व प्रकाशित करून विजय लपालीकर व ॲड राजीव देशपांडे यांच्यासह केलेल्या या सांघिक कार्यामुळे महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांना अमूल्य वैचारिक देणगी मिळाली आहे. दिवाकररावांचे नागपुरातील अग्रगण्य संस्था मातृसेवा संघाशी अतूट नाते होते. दिवाकर मोहनी यांना अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे 'भाषाव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते आणि त्यांच्या 'शुद्धलेखनाचे तत्त्वज्ञान' या पुस्तकासाठी त्यांना विदर्भ साहित्य संघातर्फे डॉ. व्ही. व्ही. मिराशी स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. नाविन्याचा ध्यास, पुढच्या पिढीशी संवाद साधण्याची तयारी, नव्हे गरज ओळखून पावले उचलणे हे निश्चित अनुकरणीय असेच आहे मृत्योपरांत देहदान करून त्यांनी समाजकारणाचा वसा पूर्णत्वाला नेला.

---

## स्मृतिवंद्य दिवाकर पु. मोहनी यांच्या स्मृतीस आदरांजली

**– रवीन्द्र देवघरे**

**दि**ली विवेक दृष्टी तुम्ही स्वत: 'सुधारक' होउनी
**वा**हिले भाषा समृद्धी – व्रतास शुद्धलेखन शिकवुनी
**क**र्तव्य अंगी बाणले सामाजिक जाण जोपासुनी
**र**क्षिले मानवी मूल्य शेवटी देहदान करुनी
**मोहनी** कुल'दिवाकर' तुम्हा नमितो आदरांजली वाहुनी

---

# माझी गच्चीवरी बाग

**– संजीवनी निमखेडकर**

खरंतर आमच्या घराला भरपूर मोठ अंगण आहे. त्यात, सोनचाफा, चिक्कू सारखे वृक्ष, वेगवेगळ्या प्रकारचे जास्वंद, रातराणी, पारिजातक, जाई, जुई सारखी अनेक झाड, वेली, लॉन, कुंड्यांमधली शोची झाडं अगदी वॉटरलिली सुद्धा असं असताना मला गच्चीत बाग कराविशी वाटली? तर त्याच उत्तर माझ्या मनात घर करून बसलेले लेख. त्यात मुख्यत्त्वे श्री. संदीप चव्हाण नाशिक यांचे गच्चीवरची बाग या विषयीचे फार पूर्वी वाचलेले लेख, आदिती देवघर यांची Brown leaf movement, तसेच Bombay Port Trust च्या गच्चीवर त्यांच्या कॅंटिनमधे उरलेल्या अन्नाचा उपयोग करून फुलवलेली बाग यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. मग शोधता शोधता Social networking मधून गच्चीवरील मातीविरहीत बाग, पुणे या ग्रुपची माहिती मिळाली आणि त्यातील एका सदस्याच्या वाक्यानं मला या गोष्टीचा ध्यास लागला I am proud to be a terace farmer हे ते वाक्य.

मग पुढे माझ्या पडळकर बाईंमुळे GMVB, Nagpur ग्रुप Join करता आला. का त्यामुळे मला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली, मागदर्शन तर सततच मिळत असतं. मुख्य म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे Compost कसं करायचं हे शिकता आलं.

गच्चीवरच्या बागेसाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे टेरेसचे Water proofing, compost (kitchen waste Vermi compost, leat compost (प्रचंड प्रमाणात वाळलेली (brown) पानं, ज्यात ज्यात झाडं लावता येतील त्या सर्व गोष्टी – कूलरच्या टाक्या, रिकामे डब्बे, बाटल्या, पोती, खोके, पिशव्या, फळांचे क्रेटस्, पर्सेस, जोडे.

मार्च २०२० मध्ये सुरू झाला कोरोना काळ, सोनचाफ्याची पानं, ओला कचरा (फळांच्या साली, काड्या, खराब झालेली पीठं असं सर्व काही घंटागाडीत जायच्या ऐवजी गच्चीवर जायला लागली. ४ बाय ३ ची विटांची कॅरी, कूलरचे ट्रे पानांनी, ओल्या कचऱ्यांनी, बगिच्यात सापडलेली गांडुळांनी भरून गेली. मग त्यावर पसरवली ४ इंच potting mix (कोको पीट, कंपोस्ट, बोन मील, विटांचे तुकडे, वाळु, राख, थोडी Garden soil) त्यात वांगी, दुधी भोपळा, शेंगदाणे, हळद, रताळं यांची लागवड केली. सुरुवातील मनासारखं काहीच झालं नाही. दोन, तीन दुधी छान वाढले नंतर वेल वाकून गेला, वांग्यांना कीड लागली, रताळ्याचा वेल चांगला फोफावला पण रताळी लागली फक्त २/३, करता करता चुका लक्षात यायला लागल्या. सर्वात महत्त्वाचं म्हणजे झाडांचे पाण्याचे लाड करायचे नाहीत, खतांचा मारा नाही, गच्चीतली झाडं ही अतिशय प्रतीकूल परिस्थितीत वाढतात त्यामुळे अजीबात घाई नाही.

अर्थात ३/४ वर्षात २.५/३ कि. लाल भोपळा, कलिंगड, २/३ कि. हळद, पपया, बटाटे, भेंड्या, टोमॅटो, गाजरं, हिरव्या, लाल मिरच्या, बादलीभर (एका वेळेस) वालाच्या शेंगा, चवळी शेंगा, सरसो, पालक सेंद्रीय ही पीकं भरपूर मिळाली.

आत्ता या अक्षयतृतियेला माझ्या बागेचा नवीन हंगाम सुरू झाला आहे. ५० लिटरच्या ड्रमात शेवगा, लिंबू, अंजीर, पेरूची झाडे लावली आहेत.

अशी आहे माझी निवृत्ती नंतरची आनंददायक प्रवासाची सुरुवात.

-------------------------------------------

# झलकारीबाई

**-कुंदा वाडेकर**

'१८५७' संग्रामाने सर्वच क्रांतिकारकांना झपाटून टाकले होते. यातील बहादूरशहा जफर पकडला गेला. पण धर्मनिष्ठपणे वागला. बहादूरशहाला पकडायला आलेल्या एका फितूराने बहादूरशहाला खिजवायला एक शेर म्हटला -

दुमदुमाये दम नहीं अब खैर मागो जान की।
ए जफर थंडी हुई समशेर हिन्दुस्थान की ।
गाझियोंमें बू रहेगी जब तलक इमान की ।
तब तो लंडन तक चलेगी तेग हिंदुस्थान की ।

याच स्वातंत्र्ययुद्धातील एक वीरांगना झलकारीबाई. ती जणू स्वामिनिष्ठ सैनिकाचा अंश घेऊन जन्माला आली होती. जिने झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंसाठी आपले प्राण पणाला लावले.

दि. २२ नोव्हेंबर १८३० रोजी झाँशी जवळील 'भोजाला' या गावी झलकारीबाईचा जन्म झाला. वडिलांचे नाव सदोवर सिंह तर आईचे नाव जमुनादेवी. लहानपणीच झलकारीबाईचं मातृछत्र हरवले होते. बालपणापासूनच झलकारीबाईला मैदानी खेळ, घोडेस्वारी, तलवारबाजी अशा सैनिक गोष्टींची आवड होती. एका प्रसंगात एका व्यापाराची लूट करणाऱ्या डाकूंना त्यांनी पळवून लावले.

झलकारीबाईंचा विवाह लक्ष्मीबाईच्या सैन्यातील एका शूर सैनिकाशी झाला होता.

राणी लक्ष्मीबाईंना माहीत होते की, स्त्रियादेखील पुरुषांच्या बरोबरीने युद्धप्रसंगी लढून आपल्या मातृभूमीची सेवा करू शकतात. त्यामुळे त्यांनी युद्ध सैन्यामध्ये स्त्रियांना भरती केले. अनेक जातीतील शेकडो स्त्री-पुरुष राणीच्या फौजेत सामील झाले. कोरी समाजातील बहादूर झलकारीबाई याला अपवाद नव्हती. झलकारीबाईचे धाडस, चपळता यामुळे त्या राणीच्या निकटच्या सैनिकात होत्या.

मार्च १८५८ च्या उत्तरार्धात जनरल 'ह्यू रोज' ने आपल्या विशाल सैन्यासह झाशीवर हल्ला केला. राणी अतिशय धाडसाने त्या विशाल सेनेशी झुंज देत होती. परंतु दगा झाला, कोणीतरी शत्रूशी हातमिळवणी केली. अभेद्य किल्लयाला खिंडार पडले. ब्रिटिश सैन्यापुढे राणीच्या सैन्याची संख्या कमी होती.

इथेच तर झलकारीबाईंच्या बुद्धिमत्ता चातुर्य, प्रसंगावधान नि अत्युच्च पराक्रमाने इतिहास घडवला. कुणालाही कळू न देता त्यांनी राणीसारखा पेहराव केला. हातात तलवार घेतली. राणीच्याच रुबाबात घोडीवर मांड ठोकली नि दिसेल त्या इंग्रजी शिपायाला कापत इंग्रजांच्या छावणीकडे बेडरपणे कूच करू लागली. एक-दोन शिपायांनी तिला पाहिले, अरे! ही तर साक्षात् लक्ष्मीबाई! आज राणीसारखं दिसणं सार्थकी लागणार! आता मात्र माझी राणी सुखरूप किल्लया बाहेर जाणार! 'ह्यू रोज'ला आज कळेल की हिंदुस्थानी स्त्री पेटून उठली तर काय अग्निदिव्य करू शकते.

सैनिकांनी पकडून आणलेल्या 'राणी लक्ष्मीबाईंना ? सेनानायक 'ह्यू रोज' समोर सादर करण्यात आले. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना ! रणरागिणी राणी एवढ्या सहजासहजी पकडली जाईल याची त्याला खात्री पटेना. पण तोपयत बराच उशीर झाला होता.

राणी दामोदरला पाठीशी घेऊन इंग्रजांशी लढत लढत किल्लयाबाहेर पडून ग्वाल्हेरच्या दिशेने रवाना झाल्या होत्या. झालेला प्रकार उघडकीस आल्यानंतर ब्रिटिशांनी झलकारीबाईंना ठार केले.

काय ते धाडस ! काय ती देशभक्ती व राणीवरील निष्ठा. देशासाठी नि स्वामिनिष्ठेपोटी आपल्या प्राणांची समिधा अर्पण करणाऱ्या वीरांगना झलकारीबाईना विनम्र अभिवादन !

---

# पेंग्विन परेड फिलीप आयलँड मेलबोर्न

**- मीना शेलगांवकर**

मेलबोर्नच्या वास्तव्यातील शेवटची टूर होती फिलिप आयलँड पेंग्विन परेडची. ऑस्ट्रेलिया मध्ये बरेच ठिकाणी प्राणी संग्रहालय, एक्वेरियम बनवले आहेत. जंगलातही कोआला, कांगारू विविध रंगाचे पोपट, पक्षी दाखवायला नेतात. परंतु इथली जंगले ही शिस्तबद्ध, व्यवस्थित वाढवलेली व जंगली श्वापदे म्हणजे मांस भक्षक प्राणी नसल्याने बागेत फिरल्यासारखेच वाटते. हे पेंग्विन पाहणे हे असेच काहीसे असेल अशी माझी समजूत होती.

आमची टूर मेलबर्न पासून सकाळी अकरा वाजता निघाली व बीचेस इतर प्राणी संग्रहालय दुपारचे जेवण असा टाईमपास करत साडेचार पाचला फिलिप्स

आयलंडला पोहोचली. त्यादिवशी नेहमीप्रमाणे मेलबर्न (व्हिक्टोरिया स्टेटमध्ये आहे) हवामानाप्रमाणे दिवसभरात चार ऋतू होते ऊन, पाऊस, थंडी आणि वारा. नेमका त्यादिवशी वारा व पाऊस अर्थात थंडी घेऊन टूर साईट सिईंग साठी थांबली की सुरू व्हायचा, बसमध्ये बसलो की आकाश स्वच्छ आणि ऊन. त्यामुळे संध्याकाळपर्यंत तेच तेच पाहून व वातावरणामुळे थोडे कंटाळवाणी झाले होते. सोबतीला खास मित्रही नव्हते. वेळेवर आमचेसाठी येऊ न शकल्याने त्यांची उणीव भासत होती. असो.

फिलिप्स आयलँड हे साऊथ ओशनमधले एक बेट आहे. चारही बाजूंनी समुद्र व किनारपट्टी दगडाळ व डोंगराळ टेकड्या. विक्टोरियाच्या अगदी दक्षिण टोकास आहे. पुढे पूर्वेकडे तस्मानिया व त्यानंतर सरळ न्यूझीलंड. इथे अंटार्टिकावरून येणारे थंडगार वारे वाहतात, समुद्राचे पाणीही थंड आहे. या बेटावर जाण्यासाठी रँड सिमो या गावावरून एक खूप मोठा पूल बांधला आहे. बेटावर मोठ-मोठे गाई बकऱ्यांचे फार्म, शेती व मुख्यतः पेंग्विन आणि विविध पक्षी राहतात. हे एक अभयारण्य आहे. लोकवस्ती साधारण आठ दहा हजार. परंतु दरवर्षी ३० ते ४० लाख लोक इथे पेंग्विन परेड पाहण्यासाठी येतात. इथे बाईक रेसिंगचा ग्रँड प्रिक्स मार्ग आहे. हा एक नेचर पार्क आहे असे गाईडने सांगितले.

आम्ही पाचच्या सुमारास नोबिन आऊट क्राय नावाच्या विजिटर सेंटरला गेलो. इथून सील रॉक्स दिसतात. हे सील्स इथे दगडावर ऊन खायला येतात. खाली उतरल्यावर पावसाने व थंडगार वाऱ्याने स्वागत केले.

पार्किंगच्या समोरच एक छोटी टेकडी होती व त्यावर सीगलची घरे होती. मस्त एखाद्या शोकेसमध्ये ठेवल्याप्रमाणे सीगल अंडी उबवताना बसतात तसे गवतात घरटी करून बसले होते. बाजूला होता समुद्रकिनारा अत्यंत खडकाळ व रुक्ष. या दगडांमध्ये सील प्राणी ऊन खायला येऊन बसतात आणि पेंग्विन्सची घरे आहे असे गाईडने सांगितले.

समुद्राच्या काठावर छान बांधलेली मोठीच्या मोठी झुलती पायवाट होती. त्यावरून फिरताना खाली आजूबाजूला प्राणी शोधायचे.

अर्थात सर्व टूर प्रमाणे पाहण्याच्या ठिकाणी वेळ खूप कमी दिलेला असतो. त्यातला अर्धा वेळ टॉयलेटच्या रांगेत जातो उरलेला सोविनियर शॉप फिरवून तुम्हाला बाहेर पडावे लागते. बहुतेक ठिकाणी मेंटेनन्सच्या नावाखाली तिकीट असते. ऑस्ट्रेलियामध्ये मात्र सर्व सोयी खाणे पिणे, बाथरूम व स्वच्छता तसेच अपंगांसाठीच्या सुविधा व्यवस्थित पार्किंग उपलब्ध करून दिलेले असल्याने तिकिटासाठी फारसे वाईट वाटत नाही.

अथांग पसरलेला साउथ ओशन, पश्चिमेकडे गेलेला थोडा क्षीण झालेला सूर्य, थांबलेला पाऊस, यामुळे आम्ही इथे फोटोग्राफी व समुद्र दर्शनाचा छान अनुभव

घेतला. आपण साऊथ पोलच्या जवळ आहोत ही एक अनुभूती होतीच. तरी अजून पेंग्विन प्रकरण नीट कळले नव्हते.

तिथून नंतर कोविज नावाच्या बेटावरच्या गावात रात्रीच्या जेवणासाठी परत आलो. गाईडने सांगितले सात वाजेपर्यंत परत या, साडेसात वाजता पेंग्विन परेड पाहायला जागा पकडायला जायचं आहे. शेवटी साडेसात वाजता सुंदर लँड बीचवर जिथे पेंग्विन परेड पाहण्याचे व्हिजिटिंग सेंटर आहे तिथे पोहोचलो. इथेही सर्व सोयी आहेत. इथे तिकीट दाखवून समुद्राकडे चालू लागलो. साधारण दोन अडीच मैल इतकी मोठी तिथे पूल वाट बांधली आहे. ही साधारण दोन गाड्या जातील एवढी रुंद व समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाते. खाली सगळीकडे दगडी, ओबडधोबड, गवत असलेला किनारा होता. ह्यातच पेंग्विनची घरटी आहेत. पंधरा-वीस मिनिटे चालत गेल्यावर समुद्रकिनारी म्हणजे पाण्यापाशी आलो. हलका पाऊस, थंड वारा होताच सोबतीला. इथे छोटासा बीच होता त्याला समरलँड बीच असं म्हणतात. त्यावर पायऱ्या बांधल्या होत्या स्टेडियमच होते एक प्रकारचे. लाईट्स होते आम्ही अगदी पहिल्या पायरीवर वाळूजवळ तेही उजवीकडच्या बाजूला गाईडच्या सांगण्यानुसार बसलो. थंडी वाऱ्यापासून स्वतःला संरक्षित करत एकदाचे पेंग्विन पाहायला म्हणून स्थिरावलो. हे ठिकाण साधारण यू आकाराचे आहे.पश्चिमेकडून एका उंच असा डोंगरकडा, एका बाजूने आहे तर पूर्व कडे दूरवर वाळूची किनारपट्टी. संध्याकाळचे, रात्रीचे म्हणून या, आठ वाजायला आले होते परंतु सूर्य अजून कासराभर वर होता. त्याची सूर्यास्ताला जायची बहुधा तयारी नसल्यासारखा रेंगाळला होता. डोंगर असल्याने दिसत नव्हता पण त्याची रंगाची उधळण सुरू झाली होती. आकाश ढगाळले असल्याने एखादा ढग अधून मधून आमच्यावर गुलाब पाणी शिंपडून पुढे पुढे जात होता. वारा त्याला पुढे पुढे ढकलत होता व हा हट्टीपणा करत होता. सूर्यकिरणे ढगांमुळे आकाशाकडे झाकोळली होती परंतु समुद्रांच्या लाटावर मात्र मस्त बागडत होती. सीगल पक्षी पाण्यावर तरंगत होते. मध्येच एकमेकांना ढकलत होते आमच्या आजूबाजूला काही खायला मिळेल म्हणून फिरत होते आणि तिथे दुसरा कोणी आला की त्याला ढकलत होते. वाळूत टूर मधली छोटी मुले उनाडत होती. त्यांना ना थंडीची फिकर होती ना पावसाची. निसर्ग शांत असला की किती विलोभनीय असतो व हे अनुभवण्याचे सुख आपल्याला मिळते आहे याने माझे मन अत्यंत सुखावले होते. सोबत आयुष्याचा जोडीदारही होता अजून काय हवे? दिवसभराचा उदासपणा क्षणात गेला व पेंग्विनच्या वाटेकडे डोळे लागले.

काय पहावे व कुठे पहावे हा विचार मनात सुरू असताना एक भगवे जॅकेट मधला व्यक्ती भोंगा घेऊन समोर आला व माहिती देऊ लागला. या बेटावर साधारण पंचवीस हजार पेंग्विनची त्यांना लिटिल पेंग्विन्स म्हणतात, वस्ती आहे. ही आजूबाजूला

जी खडकाळ गवताळ समुद्र किनारपट्टी आहे त्यात त्यांची घरे व पिल्ले आहेत. पेंग्विन मायबाप सूर्योदयाला अन्न गोळा करायला समुद्रात जातात. साठ-सत्तर किलोमीटर पर्यंत दूर जातात. मासे पोटात जमा करतात व दोन-तीन दिवसांनी या समोरच्या समुद्रातून परत घरट्याकडे येतात. साधारण दोन हजार ते तीन हजार पेंग्विन येतील. कालचा आकडा इतका इतका होता इत्यादी. अर्थात आज सकाळी जे समुद्रात गेले ते पेंग्विन्स आज परत येणार नाहीत तर जो गट दोन-तीन दिवसांपूर्वी समुद्रात गेला आहे तो ग्रुप आज परत येईल. असे वर्षभर सुरू असते. सूर्योदयाला एक गट जातो व सूर्यास्तानंतर एक गट परत येतो हा सूर्यास्तानंतर येणारा गट रोज आपण पाहू शकतो. ह्यांच्या पिलांचा मुख्य शत्रू म्हणजे ईगल. आम्ही संध्याकाळी आकाशात घरट्या घालणारे ईगल्स पाहिले होते. ईगल पासून वाचण्यासाठी हे पेंग्विन्स सूर्यास्तानंतर येतात. आता कृपया शांतता राखा, फ्लॅश लाईट ने फोटो काढू नका इत्यादी सूचना देऊन तो गायब झाला. तोपर्यंत रात्रीचे साडेआठ वाजले होते. तरी अजून भरपूर उजेड होता. पूर्ण सूर्यास्त झालाच नव्हता. डोळे खारट वाऱ्याने जरा चुरचूरू लागले होते. तरी नजर मात्र समुद्रात कुठे काही दिसते का हे शोधत होती. बघता बघता नऊ वाजले. सूर्य पूर्णपणे मावळला तरी संधिप्रकाश भरपूर होता. पांढरी वाळू अजूनही चमकत होती आणि अचानक डावीकडे समुद्र किनारपट्टीवर आठ दहा पक्षी ताठ उभे राहिले. पाण्यात त्यांची डोकी तरंगताना दिसली होती पण वाटले सीगल असावेत. हा लिटिल पेंग्विन्सचा ८-१० जणांचा पहिला ग्रुप काठावर आला होता. त्यांचा मोरक्या समोर होता पण तो गोंधळलेला वाटला त्यांनी समोर पाहिले व तो सर्वांना घेऊन परत समुद्रात गेला. ओहोटी होताच सर्वजण परत आत गेले व उजव्या बाजूने जिकडे डोंगरकडा होता त्या बाजूने बाहेर येऊ लागले.

आम्ही पेंग्विन यायला सुरुवात झाली म्हणून उत्साहित झालो. नजर उजवीकडे डोंगरकड्याकडे गेली आणि काय आश्चर्य एकामागे एक असे आठ दहाच्या संख्येमध्ये पेंग्विनचे ग्रुपच्या ग्रुप्स त्या बाजूने वाळूवर उभे राहत होते. सर्वजण एक दुसऱ्यासाठी थांबत होते. ग्रुपमधील सर्व एका मागोमाग एक असे शाळकरी मुलासारखे लाईन लावून उभे रहात व मग किनाऱ्याकडे चालू लागत. चालणे मोठे गमतीशीर होते. फताडे पाय पदक पदक करत चालत होते. पोटात पिलांसाठी अन्न असल्याने पोटे फुगलेली, सावकाश सावधान चाल. पाठी डोके काळसर गडद रंगाची. जणू अंगावर जॅकेट व डोक्यावर आपण हुड घालतो तशी. पोट मान सर्व चकचकीत रुपेरी, समोरील हात म्हणावे की पाय छोटेसे एका लयीत हालत होते. चालताना सर्व कदम ताल करत परेड करत चालावे अशी त्यांची रांग होती. बघता बघता त्यांची संख्या हजारावर गेली व सर्वजण किनारपट्टीला आल्यावर आपापल्या घरट्याकडे वेगवेगळे होऊन पांगू लागले. आम्हीही स्टेजच्या पायऱ्या चढून पूल

वाटेवरून चालू लागलो. खाली पेंग्विन दिसू लागले. पिल्लांना खाऊ घालणारा एक पेंग्विन दिसला.

काही जण घराकडे चालत होते, काही जण त्यांच्यासाठी केलेल्या रस्त्यांवरून पुढे पुढे जात होते. हळूहळू अंधार वाढू लागला. संधिप्रकाश संपला. उगवत्या रात्रीच्या अंधुक प्रकाशात त्यांची चमकणारी पोटे दिसत होती. सर्वजण उत्साहात होते फोटो काढत होते निरीक्षण करत होते आम्हा दोघांची त्यात पांगापांग झाली. पार्किंगमध्ये नेमकी आपली बस कोणती हे कळेना. हात आपोआप मोबाईलवर गुगल शोधू लागला. अचानक जाणवले खरंच आपण किती यांत्रिक झालो आहोत. हे पेंग्विन ६०–७० किलोमीटर दूर महा समुद्रात जातात अन्नाच्या शोधात तीन चार दिवस भटकतात आणि बरोबर आपले घर पिल्ले शोधत येतात. पहिला ग्रुप चुकून चुकीच्या बाजूने काठावर आला होता तो परत समुद्रात गेला व दुसऱ्या बाजूने घराकडे गेला हे सर्व कसे होत असेल? कोणते कंपास त्यांच्या मेंदूत देवाने बसवले असतील? हजारो किलोमीटर मायग्रेशन करणारे पक्षी प्राणी शतकानुशतके हे कसे करत असतील? सुरुवात कशी झाली असेल? ब्रीडिंग ग्राउंड, सीजन कसे ओळखत असतील? आणि आपण साधे एका ठिकाणाहून दुसरीकडे जायचे तर हल्ली गुगल वापरू लागलो आहोत.

निसर्गाची किमया पाहून नतमस्तक व्हायला झाले व कधी नव्हे ते ज्ञानेश्वर आठवले 'तुज सगुण म्हणू की निर्गुण रे, तू सगुण निर्गुण एक गोविंदु रे'!

---

## 'ऑनर किलिंग'ची विकृती

**– डॉ. सुषमा भोसले**

सन्मान, या शब्दाचा अर्थ अभिमान, आदर, असा होतो. पुरुष आणि मादी यांना सन्मान प्राप्त करण्याचे वेगवेगळे मार्ग आहेत. पुरुषांसाठी सन्मानाचे स्रोत म्हणजे त्यांच्यापेक्षा दुर्बल, असुरक्षित आणि स्त्रियांवर वर्चस्व गाजवणे, आणि त्यात अपयशी ठरल्यास सन्मान गमावल्याची भावना! स्त्रियांसाठी, शुद्धता, सहनशीलता, कौमार्य, आज्ञाधारकता इत्यादी कल्पना आहेत. कालांतराने, पवित्रता आणि सन्मानाच्या जुन्या संकल्पना बदलल्या तरी वर्षानुवर्षे सम्मानाची धारणा पुरुषांबाबत तशीच आहे. जातिव्यवस्था भारतीय समाजाच्या संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे आणि समाजाच्या 'उच्च जाती'शी संबंधित एक विशिष्ट 'सम्मान' असल्याचे दिसते. म्हणून, जर एखाद्या स्त्रीने एखाद्याशी लग्न केले किंवा तिच्या जातीच्या किंवा समाजाच्या बाहेरील कोणाशी संबंध ठेवले तर ती कुटुंबासाठी 'अपमान' आणते, कुटुंबाचे नाक कापते, असे म्हटले जाते. जोडीदार निवडणे हा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे अर्थातच विवाहाचा अधिकार हा घटनेने दिलेल्या जीवनाच्या अधिकाराचा

भाग आहे. मात्र जातिव्यवस्थेचा कठोर परिणाम आंतरजातीय विवाहांना परवानगी देत नाही; ज्यामुळे जोडप्यांना समजापासून पळून जाऊन लग्न करावे लागते. ग्रामीण आणि शहरी भागातही मागास जाती, दलित यांच्यावर नेहमीच अमानुषतेचे सावट दिसते. कुटुंबात दलित भागीदार स्वीकारले जात नाहीत. किंबहुना, कौटुंबिक संबंधांमध्ये त्यांचे असणे सामाजिक दृष्टिकोनातून अपमानास्पद कृत्य मानले जाते. सन्मान आणि श्रेष्ठता, जातीवर आधारित वर्चस्व यांसारख्या कल्पनांचे मूळ धार्मिक ग्रंथांमध्ये अंतर्भूत आहे.

ऑनर किलिंगसंदर्भातील चर्चेत 'घरच्यांची इज्जत केवळ मुलीच्या विवाहसंबंधात किंवा लैंगिक संबंधातच अडकलेली असते का, हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. घरातली व्यक्ती चोरी, बलात्कार, निष्पापांचे खून, समाज किंवा देशविरोधी कृत्यात गुंतलेली आढळते, त्या वेळी कुटुंबाची समाजात इज्जत कमी होत नाही का? समाज किंवा कुटुंबाकडून कोणतीही कारवाई झालेली क्वचित आढळते. मग 'ऑनर किलिंग' चे नेमके सत्य काय? २०१० मध्ये 'शक्तिवाहिनी' या स्वयंसेवी संस्थेने ऑनर किलिंगसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय दिला होता की, दोन सज्ञान व्यक्तींनी स्वेच्छेने केलेल्या विवाहात तिसरा कुणीही हस्तक्षेप करू शकत नाही. तसेच हिंदू विवाह कायद्यानुसार एकाच गोत्रात विवाहासही बंदी नाही. पुढे ऑनर किलिंगविरोधात 'प्रिव्हेन्शन ऑफ क्राईम इन द नेम ऑफ ऑनर बिल' मान्यही झाले. यानुसार सज्ञान व्यक्तींनी स्वेच्छेने केलेल्या विवाहाला मातापिता, कुटुंब किंवा जातपंचायत विरोध करू शकत नाही. नवविवाहित दाम्पत्यांनी तक्रार केली, तर विवाहास विरोध करणारे, दडपण आणणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईही होऊ शकते. अशात आपण कोणताही दबाव आणला नाही, हे सिद्ध हा करण्याची जबाबदारी त्या दोषी ठरवलेल्या व्यक्तीची आहे. ऑनर किलिंग झालेल्या घटनांत केवळ तीन टक्के विवाह हे सगोत्र होते. इतर कारणामुळे झालेल्या ऑनर किलिंगचे प्रमाण ९७ टक्के होते.

भक्कम घटनात्मक तरतुदी असूनही, अलीकडच्या काळात ऑनर किलिंगची प्रकरणे दिसून येत आहेत, कारण जातीय मानसिकता प्रबळ होत चालली आहे. जातीमुळे येणारी आर्थिक, सामाजिक, मानसिक ताकद हातातून निसटेल, अशी भीती यामागे असते. जातीय मानसिकता, खोटी सामाजिक प्रतिष्ठा आणि सत्तेचा हव्यास यामुळे आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुला- मुलींना संपवले जाते. माणसापेक्षा जात महत्त्वाची, ही मानसिकता बदलायला हवी. घरातली स्त्री म्हणजे आपली संपत्ती आहे, असे मानले जाते. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही, म्हणूनच हे प्रश्न निर्माण होतात. बाईने स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायचे नसतात. तिला बरे-वाईट कळत नाही, अशी पितृसत्ताक-पद्धती आपल्याकडे आहे. स्त्रीसाठी काय

योग्य-अयोग्य हे आम्ही ठरवणार, हा दंभ टिकून आहे आणि आमच्या कल्पना धुडकावणाऱ्या स्त्रीला आम्ही शिक्षा करणार, हा भयंकर उन्मत्तपणाही. स्त्रियांची स्वतः जोडीदार निवडण्याची कल्पना पटण्या, न पटण्याचा, न पटलेला विचार खोडून काढण्याचाही अधिकार कुटुंबियांना आहे. पण म्हणून तिला शिक्षा करण्याचा, किंवा मारून टाकण्याचा अधिकार कोणालाही नाही.

बहुतेक पालक मुला-मुलींना लाडात वाढवतात. मात्र एक चुकीची सार्वत्रिक भावना दिसते, की मुलगी- मुलगा दोघांनीही सगळे काही आपल्या मर्जीने केले तरी चालेल, विवाह मात्र घरच्यांच्या मर्जीने करावा. त्यामुळे ज्या आई-वडिलांनी जन्म दिला, त्यांच्याशीच मुलांना आपलं प्रेम, स्वतः निवडलेल्या जोडीदाराबाबत चर्चा करण्याची भीती वाटते. याबाबत पालकांनी गांभीर्याने विचार करायला हवा. त्यांना मुलांचा निर्णय पटत नसेल, तर त्यांच्याशी बोलायला हवे. मुलांना मालमत्ता न समजता त्यांच्यावर फक्त अधिकार न गाजवता. जोडीदार निवडीविषयी कुटुंबियांनी त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे. पण मुलांच्या जीविताशी खेळण्याचा पालकांना अधिकार नाही.

साहजिकच ऑनर किलिंगच्या घटना घडूच नयेत, यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी घटनेने नागरिक म्हणून एका स्त्रीला दिलेले समता आणि अभिव्यक्ति-स्वातंत्र्य, विवाहासंदर्भात आणि एकंदर माणूस म्हणून दिलेले अधिकार प्रत्येकाला कळायलाच हवेत. चोरी, खून, दरोडा, बलात्कार वगैरे गुन्हे ठरतात. जातिवाचक शब्द बोलले, तर 'ॲट्रासिटी कायदा' आहे, ही जागृती झाली, तशीच जागृती ऑनर किलिंगविरोधात व्हायला हवी. सज्ञान झाल्यानंतर आपल्या मर्जीने केल्या जाणाऱ्या विवाहाला विरोध करणाऱ्यांना, गुन्हेगार ठरवून शिक्षा मिळू शकते, याची जागृती गरजेची आहे. पण, यातील गुन्हेगार स्वतःला न्यायी ठरवतो. समाजात सन्मान मिळेल, असे त्याला वाटते. मग तो कायद्याला कशाला घाबरेल, हेसुद्धा काही प्रमाणात खरे आहे. मात्र, ही मानसिकता बदलण्यासाठी त्या व्यक्तीवर प्रभाव टाकणाऱ्या समाज संस्थांची मानसिकता बदलायला हवी. कायद्याने नसलेल्या, पण समाजात आजही असलेल्या जातपंचायतींमध्ये जागरण करायला हवे. त्यांना समता, स्वातंत्र्याचे कायदे सांगायला हवेत जाणीवपूर्वक त्यांच्यापर्यंत पोहोचवायला हवेत.

स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे मानणाऱ्यांनी हे आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या पाठीशी उभे राहायला हवे, त्यांना संरक्षण द्यायला हवे. ही जोडपी आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असे कार्यक्रम आखायला हवेत ऑनर किलिंगसारख्या घटना आजूबाजूला पडू नयेत, यासाठी माणूस म्हणून, सजग राहायला हवे.

-----------------------------------------

# आनंदी जीवनाचा मंत्र

**सौजन्य – सौ रागिणी बक्षी**

आनंद म्हणजे काय तर आनंद हा प्रकार असतो, त्याला एका शब्दात व्यक्त करणे कठीणच. एखादी गोष्ट जी आपल्याला समाधानी करत असेल तर त्या समाधानाला सुद्धा आपण आनंद म्हणू प्रत्येक जीवनात सुखदुःख ह्या गोष्टींचा सामावेश असतो, माणसाच्या झाल्या तर आनंद आणि मनाच्या विरुद्ध झाल्या तर दुःख, संपूर्ण जीवनात दोन परिस्थितीमध्ये माणूस आपले जीवन जगत असतो.

दुःख झाले तर तो रहतो आणि आनंदात हसतो, पण मानवी जीवनात ह्या दोन परिस्थिती खूप महत्त्वाच्या आहेत, कारण या दोन परिस्थितीमुळे माणसाला कळतं की खरं कोण आणि खोटं कोण? आयुष्यात दुःख तर पावलोपावली आहे पण तोच व्यक्ती महान ज्याने दुःखातही स्वतःला धीर देत त्यावर हसून मात करतो, आयुष्य खूप सुंदर आहे.

संत तुकाराम महाराजांनी म्हटलं आहे 'सुख पाहता जवापडे अन् दुःख पर्वताएवढे' आयुष्यात दुःखाचा डोंगर असला तरी आपण हसत राहून समस्यांना सामोरे गेले पाहिजे. जगावं असं की बाकीच्यांनी आपलं उदाहरण देत आयुष्य जगलं पाहिजे, आनंदी राहण्याचा एकच मंत्र 'अपेक्षा स्वतः कडून ठेवायच्या दुसऱ्याकडून नाही', दुसऱ्याकडून ठेवल्या तर त्यांचा भंग झाल्यावर आपल्याला त्रास होतो म्हणून स्वतःवर विश्वास ठेवत या जीवनात पुढे चालत रहा.

सुख हे फुलपाखरासारखे असते. पाठलाग केला तर उडून जातं बळजबरी केली तर मरून जातं, निरपेक्षपणे काम करत राहिले तर मनगटावर अलगद येऊन बसतं.

इतरांचे सुख पाहण्याची क्षमता ज्यांच्याकडे असते, त्यांची प्रगती साक्षात देव ही रोखू शकत नाही.

---

# स्मिता मांजरे

**– डॉ. रमा दत्तात्रय गर्गे**

स्मिता मांजरे नावाची एक मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबातील मुलगी. बारावी झाल्यावर तिला वैद्यकीय शिक्षण घ्यायचे होते. पण घर थोडे जुन्या वळणाचे, काय करायचे मुलीला इतके शिकवून, असा विचार करून जवळच्याच कॉलेजमध्ये तिला बीएसाठी प्रवेश घेऊन दिला. या युवतीला थोडे वाईट वाटले, पण आहे त्या परिस्थितीशी जुळवून घ्यायचे आणि पुढे जायचे हा तिचा मूळ स्वभाव!! बीए करताना भरपूर वेळ मिळायला लागला. अभ्यास थोडासा असायचा, त्यातून मग खेळाची आवड निर्माण झाली. सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. अभाविप, छात्र युवा, संघर्षवाहिनी यांचे आंदोलने कार्यक्रम यात ती सहभागी होऊ लागली.

पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काहीतरी व्यवसायाभिमुख शिक्षण घेतले पाहिजे असे तिच्या मनात आले. त्यानुसार एलएलबीला प्रवेश घेतला. पण मनातली वैद्यकीय शिक्षणाची इच्छा परत जागृत झाली आणि मग दहावीच्या गुणपत्रिकेवर तिने डीएचएमएस या होमिओपॅथीच्या पदविकेसाठी पण प्रवेश घेतला! कालानुक्रमे दोन्ही शिक्षणे पूर्ण केली आणि वकिली आणि डॉक्टरी अशा दोन्ही व्यवसायाभिमुख पदव्या स्मितातार्इंनी मिळवल्या. त्यानंतर आवडीप्रमाणे नागपुरात स्वतःचा दवाखाना टाकला. तो चांगलाच चालू लागला. डॉ. स्मिताच्या हाताला चांगला गुण होता. भरपूर पेशंट येत असत. त्या आणि त्यांची असिस्टंट दवाखाना संपल्यावर सगळे पैसे मोजत बसायच्या. स्वतःचा दवाखाना झाला, दुचाकी आली आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. यामुळे डॉक्टर स्मिता मांजरे यांना एक वेगळाच आत्मविश्वास मिळाला.

यादरम्यान घरात लग्नाचे वारे वाहू लागले. त्या काळात म्हणजे १९८० च्या दशकात चहा पोहे आणि मुलगी पाहणे असे कार्यक्रम सर्रास होत असत. पण स्मितातार्इंनी एक-दोन कार्यक्रम झाल्यानंतर हे दाखवून घेणे काही बरे नाही, असे वाटून त्यांनी ते थांबवले.

या दिवसात त्यांच्या हातामध्ये विनोबा भावे यांचे 'गीता प्रवचने' हे पुस्तक पडले. जसजशा स्मिताताई हे पुस्तक वाचत होत्या तसतसे त्या अंतर्मुख होत गेल्या. त्यामध्ये सांगितलेली 'जीविका आणि उपजीविका' यांचा विचार त्यांच्या मनात येऊ लागला. 'माझा स्वधर्म काय आहे' या विचाराने त्यांना भंडावून सोडले. अंगावर ल्यायला उत्तम कपडे, दागदागिने, फिरण्यासाठी गाडी, चांगली कमाई हे सगळं असूनही काहीतरी अनुपस्थित आहे, असे व्याकुळ असमाधान या युवतीला जाणवू लागले.

त्याच भागात एक ध्येयवेडा तरुण डॉक्टर एम्. डी. पूर्ण करत होता. एमबीबीएस झाल्यावर तो बैरागड या मेळघाट जिल्ह्यातील गावी जाऊन राहिलेला होता. त्याच लोकांसाठी अधिक शिक्षण घेऊ या हेतूने तो पदव्युत्तर शिक्षण घेत होता. या डॉक्टरचे नाव होते रवींद्र कोल्हे !! बैरागड येथील आदिवासी जनजाती लोकांना आरोग्य सेवा द्यायची हे ध्येय ठरवून बसलेला हा तरुण सुयोग्य जीवनसाथीच्या शोधात होता. यादरम्यान स्मितातार्इंचे परिचित सुभाष काळे यांनी तार्इंना हे स्थळ सुचवले. पण त्याचबरोबर मुलाच्या वेगळ्या चार अटी सांगितल्या. या अटी काय होत्या

१) महिन्याला चारशे रुपयांमध्ये संसार करावा लागेल. २) चाळीस किलोमीटर पायी चालता आले पाहिजे. ३) लोकांसाठी समाजासाठी भिक्षा मागण्याची तयारी असली पाहिजे. ४) कोर्ट मॅरेज करावे लागेल.

सुभाष काळेंनी सहजच सुचवले होते. कारण त्यावेळची स्मितातार्इंची

राहणी ही उच्चभ्रू प्रकारातील होती. जेव्हा या अटी कळल्या तेव्हा आपण चारशे रुपयांची साडी नेसत होतो, गाडीवरून नागपुरात आरामात फिरत होतो आणि आपली कमाई पण भरभक्कम होती असे स्मितातार्ई एका मुलाखतीत सांगतात.

मात्र जसजसा त्या या अटींचा विचार करू लागल्या तसतसे त्यांना गीता प्रवचने वाचल्यापासून ज्या असमाधानाने अस्वस्थ केले होते ते असमाधान दूर होऊ लागले असा प्रत्यय आला. त्यांना या अटींमध्येच आपला स्वधर्म आहे, आपले जीवन ध्येय आहे याची आंतरिक जाणीव झाली. आणि मग दोघे भेटले १९८८ साली. या ध्येयवेड्यांनी विवाह बंधन स्वीकारले. डॉ. स्मिता मांजरे डॉक्टर स्मिता रवींद्र कोल्हे म्हणून सातपुडा पर्वतरांगातील अरण्यात असलेल्या बैरागडला आली. लग्न कोर्ट पद्धतीने झाल्यामुळे सप्तपदी झाली नाही. मात्र नवऱ्याच्या घरी जाण्यासाठी नव्या नवरीला तालुक्याच्या ठिकाणापासून बैरागड पर्यंत ३५ किलोमीटर चालत जावे लागले. लग्न ठरल्यानंतर स्मितातार्ईंनी दवाखाना बंद केला. आपले साठवलेले सगळे पैसे त्यांनी बँकेत एकरकमी डिपॉझिट करून ठेवले. स्वस्तातल्या साड्या खरेदी केल्या. महाग महाग साड्या मैत्रिणी आणि बहिणींना दिल्या. उंची सँडल्स, पर्सेस, प्रसाधने सारे काही वाटून टाकले आणि खऱ्या अर्थाने नवजीवनचा प्रारंभ केला!

डॉक्टर रवींद्र कोल्हे पूर्वीपासूनच तेथे आरोग्य केंद्र चालवत होते. ते एक रुपया इतकीच फी दवाखान्यात घेत असत. औषधांसाठी शहरातील धनिक लोकांना विनंती करून आदिवासी लोकांना जमतील तितकी औषधेही ते उपलब्ध करून देत. स्मितातार्ईंनी जेव्हा बैरागडमध्ये पाऊल टाकले तेव्हा त्यांची स्वतःची झोपडी देखील नव्हती. आजूबाजूच्या जनजाती लोकांनी लाकडे कुडे आणि गवताने शाकारलेली झोपडी तयार करण्यासाठी त्यांना मदत केली. सतत शहरी वातावरणात राहिलेल्या स्मितातार्ईंचा एक वेगळाच प्रवास सुरू झाला. वीज नाही, नळ नाही, पिठाची गिरणी नाही, जवळपास दुकाने नाहीत असा नन्नाचा पाढा सगळीकडे दिसत होता. त्यातच आजूबाजूला दारिद्र्याने गांजलेली, आजाराने ग्रस्त आणि अज्ञानी अशी आदिवासी जनजाती कुटुंबे. त्यांची भाषा वेगळी चालीरीती वेगळ्या. किर्र अरण्याचा एक वेगळाच गंध, शहरी सुरक्षिततेची उब नाही अशा सगळ्या गोष्टी त्यांना नव्याने जाणवू लागल्या. पण एकदा मनापासून कार्य स्वीकारले की समस्या भेडसावत नाहीत. थोड्याच दिवसात विहिरीवरून पाणी भरणे, शेण गोळा करून आणणे, घर सारवणे, जात्यावर दळणे ही सगळी कामे त्यांच्या अंगवळणी पडली. नवीन शिकण्याची आवड त्यांना येथे कामाला आली.

एका मोठ्या लोक वस्तीला एकच डॉक्टर असल्याने कोल्हेना अक्षरशः श्वास घ्यायला फुरसत नसे. खरं म्हणजे स्मितातार्ईंना पण आपण आरोग्यसेवा द्यावी,

पेशंट तपासावे असे वाटत असे. पण सुरुवातीला आदिवासी लोकांचा एक स्त्री डॉक्टर असू शकते यावर विश्वासच नव्हता. त्यांना तेथील लोक कोल्हं आणि कोल्हाणी म्हणत.

एक घटना घडली आणि लोकांनी कोल्हाणीला वैद्यकीय ज्ञान आहे हे स्वीकारले!! वाघाने अक्षरशः फाडलेला एक पेशंट आला आणि त्यावेळी स्मितातार्ईंना जवळपास ४०० टाके घालावे लागले. अत्यंत चिकाटीने त्यांनी ते काम पूर्ण केले आणि तो पेशंट  वाचला!! काही दिवसात बरा झाला. नंतर तो चालत दवाखान्यात आला आणि डॉक्टरबाईंना नमस्कार करून गेला! तेव्हापासून आदिवासी जनजाती लोकांनी ताईंना डॉक्टर म्हणून सहर्ष स्वीकारले!! मग मात्र तपासायला ताईच हव्या अशी आग्रही मागणी पण सुरू झाली!!

मेळघाटात कुपोषणाचे बळी जात असतात. आत्ताही जातात. पण आता प्रमाण कमी आहे. त्यावेळी रवींद्र कोल्हेंनी एमडीला हाच विषय घेऊन प्रबंध लिहिला. त्यांच्या मते हा प्रकार उपासमारीमुळे अर्थात अन्न कमी पडल्यामुळे, पोटाची खळगी न भरल्यामुळे घडतो.त्यांनी नंतर अशाच प्रकारच्या मृत्यूची बातमी एका वृत्तपत्राच्या बातमीदाराला दिली. छोट्या चौकटीतील त्या बातमीने दिल्ली मुंबई हादरली. कारण आपल्या संविधानानुसार ''स्टारव्हेशन कोड'' म्हणजे 'भूकबळी' हा शासनाचा गुन्हा मानला जातो. गल्लीपासून दिल्लीपर्यंत हा विषय गाजला. दिल्ली-मुंबईत सूत्रे हलली. घाईघाईने सारे मंत्री, सरकारी अधिकारी मेळघाटामध्ये येऊन पोहोचले. त्यांनी चर्चा केली. स्मिताताई आणि रवींद्र कोल्हे यांनी तेथील भीषण अन्नटंचाई आणि त्यामुळे घडणारे बालमृत्यू, मातामृत्यू यांची माहिती दिली. मात्र या मृत्यूना 'उपासमारीचे बळी' असे न म्हणता 'कुपोषणाचे बळी' असे म्हणावे अशी शासकीय यंत्रणेने विनंती केली. सर्व प्रकारची मदत शासकीय यंत्रणा करणार आहे या गोष्टीमुळे स्मिताताई आणि रवींद्र कोल्हे यांनी देखील तसे म्हणण्याचे मान्य केले आणि मग एकेकाळी १००० मागे २०० मुले दगावत ते प्रमाण खूप कमी होत गेले. शासनाच्या मोठ्या यंत्रणेचा अशिक्षित गरीब लोकांना लाभ मिळवून देणे हे आपले ध्येय आहे. शासनाला समांतर कार्य यंत्रणा उभी करणे हे नव्हे, हे दोघही पती-पत्नींनी ठरवलेले होते.

आपल्या सोबतच्या या रान सवंगड्यांना प्रेरणा मिळावी, अन्नटंचाईला तोंड द्यावे लागू नये म्हणून स्मिता आणि रवींद्र यांनी सुधारित शेतीचे प्रयोग केले. स्वतः दुबार पिके काढून दाखवली. खते बियाणांची माहिती दिली, रेशन धान्याचे दुकान टाकले. कोल्हेंच्या दुकानांमध्ये तीस तारखेपर्यंत धान्य मिळत असे. आजही हे दुकान दिमाखात चालू आहे

आपले कार्य, त्याच्या मागची प्रेरणा ही पुढच्या पिढीत रुजवण्यातही

स्मितातार्ई आई म्हणून यशस्वी ठरल्या! त्यांचा मोठा मुलगा रोहित सुधारित शेती करतो. त्याचे प्रशिक्षण देतो. तर धाकटा मुलगा राम, एमबीबीएस, एमडी सर्जन होऊन मेळघाट बैरागड येथेच वैद्यकीय सेवाकार्य करतो. खास वैदर्भीय शैलीतील आघळपघळ बोलणे, पण आवश्यक तिथे ठामपणे उभे राहणे आणि निर्भयता हे दोन महत्त्वाचे गुण स्मितातार्ईंच्या अंगी आहेत. नामदार नितीन गडकरी हे त्यांचे एकेकाळचे अभाविप मधले सहकारी कार्यकर्ते! त्यांच्या प्रयत्नांमुळे आज मोठ्या नाल्यांवर मोठमोठे पूल झाले आहेत, बरेच ठिकाणी रस्ते देखील आले आहेत. पण म्हणून प्रश्न सुटलेले नाहीत.

नागपुरातील मध्यमवर्गीय घरातील ही कन्या आता आदिवासी बंधू भगिनींची आई झाली आहे. एखादे व्रत घेणे सोपे पण त्याचे सातत्यपूर्ण आचरण अत्यंत कठीण असते. म्हणूनच पद्मश्री डॉक्टर स्मिता कोल्हे आणि पद्मश्री डॉक्टर रवींद्र कोल्हे यांच्यासारख्या तेजस्वी दीपांचे महत्त्व असते.

---------------------------------------------

**जुलै २०२३ मधील महत्त्वाचे दिवस –**

३ गुरुपौर्णिमा, २३ लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती,

---------------------------------------------

## भूलभुलैय्या

**सौजन्य – महती**

वासुदेव नुकताच अमेरिकेवरुन घरी आला होता. सकाळच्या वेळी वासुदेव नास्ता करायला बसत होता. आईने कुतूहलाने त्याला विचारले 'तु अमेरिकेत नेमकं करतोस तरी काय?'

वासुदेव म्हणाला 'आई, तु डार्विनचं नाव ऐकलंस का? नसशिल ऐकललं, मी एक जेनेटिक इंजिनीअर आहे. त्याच डार्विनच्या मानवाच्या उत्क्रांतीच्या थेओरीवर मी काम करतोय.'

आई त्याच्या जवळ येऊन बसली आणी त्याला म्हणाली, 'अरे डार्विनची उत्क्रांतीची थिअरी तर नवी आहे. तू त्याहून जुन्या थिअरी वर काम का नाही करत?'

वासु विचारात पडला त्याला प्रश्न पडला की आता त्याहून जुनी थिअरी कुठली?

आई बोलत होती, 'तुला विष्णुचे दशावतार माहित आहेत का रे?'

वासुदेव ने डोकं 'नाही' म्हणून हलवलं......नाही ना! मग आता ऐक आई म्हणाली.

'पहिला अवतार--मत्स्य--म्हणजे मासा. जीवनाची सुरुवात पाण्यात झाली म्हणून मत्स्य अवतार ओळखला जातो.

दूसरा अवतार कूर्म म्हणजे कासव जे दर्शवतं की पाण्यातून सुरू झालेलं जीवन जमिनीकडे जातंय. यात पाणी आणि जमीन समान राहते.

तिसरा अवतार वराह म्हणजे डुक्कर. ज्याचा अर्थ जमिनीवरील पाळीव प्राणी तसेच मोठ्या आकारचे भूचर जसे डायनासॉरसारखे प्राणी जन्माला आले. यात पाण्यात कमी आणि जमीनीवर वावर जास्त.

चौथा अवतार होता नरसिंहाचा. ज्याचा अर्थ अर्धा प्राणी आणि अर्धा मनुष्य म्हणजेच प्राण्यांपासून मानवाकडे वाटचाल सुरू झाली. यात पाणी पिण्यापुरतंच. मनुष्य हा प्राण्यासारखा पण जास्त बुद्धिमान.

पाचवा अवतार वामन जो उंचीने छोटा ब्राम्हण होता पण तो मोठा होऊ शकत होता. त्याने पूर्ण पृथ्वी व्यापली होती. जुन्या काळातही असेच दोन गट hmVo Homo Sapiens आणि Homo Erectus असंच एकदा त्या दोघांच युद्ध झाल आणि ती लढाई Homo Sapiens नी जिंकली. का माहिती आहे? का जिंकली..? कारण ते उंचीने व बुद्धीने मोठे होते म्हणून जसा वामन होता.

आई पण कथेत दंग झाली होती. वासुदेव अवाक् व स्तब्ध होऊन ऐकत होता. सहावा अवतार परशुराम. जो कुऱ्हाड धारण केलेला, जंगलात राहणारा, शीघ्रकोपी तपस्वी पुरुष होता, जसा अष्मयुगातील जंगलात एकटा राहणारा प्राण्याची कात धारण केलेला मानव होता. जंगलाची कास धरून मानव मोठा होत होता

सातवा अवतार राम म्हणजे बुद्धिवंत राजा. ज्याने जगाला जगण्याचे कायदे व नात्याचे महत्त्व सांगितले. तत्सम अष्मयुगीन मानवही कुटुंब परिवार व गट करून राहू लागला होता त्याला सोबत राहण्याचं महत्त्व कळालं होतं.

आठवा अवतार कृष्ण जो एक उत्तम मित्र, गुरु, मार्गदर्शक, प्रियकर व राजा होता. त्याने जगाशी खेळ खेळून प्रेम व युद्ध यांचं ज्ञान दिलं. जीवन जगण्याची कला दिली त्यालाच आपण भगवद्‌गीता म्हणतो. तोच मानव शिक्षण घेऊ लागला त्याला शिक्षण म्हणजे काय कळले. वेगवेगळी विद्यापीठे स्थापन झालीत. मनुष्यप्राणी शिकू व शिकवू लागला.

नववा अवतार बौद्ध. जिथे एकीकडे नरसिंहासारखा हिंस्र मानव होता तिथे सत्य, अहिंसा, सदाचाराचे संदेश देणारे, जगाला मोक्षाचे महत्त्व सांगणारे बौद्ध पण जन्माला आलेत. म्हणजेच ताम्रयुगानंतर थोर संत विचारवंत जन्माला आलेत ज्यांनी जगाच्या चाली रीती बदलल्यात.'

आई एवढं बोलून थांबली.

''आणि दहावा?'' वासुदेवने कुतुहलाने विचारले.

आई हसत म्हणाली, 'अरे दहावा अवतार म्हणजे कल्कि. जो मनुष्याचा जेनेटिकमधे बदल केलेली आवृत्ती आहे ज्यावर तुम्ही अभ्यास करत आहात...'

'हा दृष्टिकोन तू कुठून आणला आई?'

'विज्ञान आणि धर्माला आम्ही अशाच नजरेने बघतो' आई न्याहारी देत हसून म्हणाली.

माणसाने नेहेमी विज्ञानासह अध्यात्मिकतेची कास धरावी. अध्यात्म समजण्यास कठीण आहे पण ते ज्याला समजले त्याने जग जिंकले.

-------------------------------------------

## झाडाची मुळे हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहेत

१) एक कडूनिंबाचे झाडं दहा हजार लिटर पाणी एकुण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते. याचा अर्थ आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब, चिंच, जांबळ, अंबा, मोह, अर्जुन या वर्गातील नक्कीच असतील. म्हणून मृत साठ्याचे पाणी पाझरत रहात असावे.

२) एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाडं एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते. आणि ते ही पन्नास फुटाच्या ही खाली. वडाची व पिंपळाचे मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात.

एक कोटी लिटर म्हणजे एका विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.

म्हणून आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा महावृक्ष लावा.

आपण एका बोअरवेलसाठी एक लाख खर्च करतो. एका विहीरीसाठी पाच लाख खर्च करतो.पण पाण्याची कुठलीच शाश्वती नाही'. – शोभा

-------------------------------------------

# दिवाकरजी मोहनी

**– प्रणव प्रियदर्शी**

जिन कुछ लोगों ने नागपुर को नागपुर बना रखा था, उनमें प्रमुख थे दिवाकर मोहनी। साल २००२ की जनवरी में मैं नागपुर पहुंचा, तो कई मायनों में आधा अधूरा था। हालांकि अब भी पूरा कहां हुआ हूं, पूर्णता पाना तो कभी पूरा न होने वाला सपना ही होता है, खासकर मेरे जैसे सामान्य व्यक्ति के लिए। लेकिन मुड़कर देखता हूं तो उस समय का अधूरापन पहली नजर में ही खटकने वाला लगता है। कोई भी समझदार आदमी एकाध मुलाकात में ही समझ जाए कि यार ये तो बड़ा कच्चा है विचारों के मामले में।

ऐसे में हो ही नहीं सकता था कि दिवाकर मोहनी की अनुभवी और पारखी नजरों से वह कच्चापन छुप जाए। मगर उनका सधापन यह था कि कच्चेपन को पकड़

लेने के बाद भी वह उसे मुद्दा नहीं बनने देते थे, न अपनी नजर में और न सामने वाले की नजर में। बस उस पर काम शुरू कर देते थे और सामनेवाले को पता भी नहीं चलता था कि धीरे-धीरे कैसे उसका कच्चापन कम होता जा रहा है।

उनके संसर्ग से हासिल परिपक्कता भी हम बहस में उन्हीं के खिलाफ इस्तेमाल करते और वह एक बार भी यह अहसास नहीं दिलाते कि बच्चू छह महीना पहले तो तुम्हीं इस तरह की बातों पर अलग तरह से रिएक्ट करते थे अब उन्हीं बातों पर मुझसे झगड़ रहे हो। बड़ी सहजता से वह बहस को दूसरी तरफ मोड़कर उससे आगे का कोई बिंदु ले आते जहां से, बगैर जाने ही हमारी आगे की वैचारिक यात्रा शुरू हो जाती।

उनकी खासियत यह थी कि वे प्यार ही नहीं सम्मान देते थे, और सिर्फ मुझे ही नहीं, उन सबको जो उनके संपर्क में आता था। वे मराठी में आजचा सुधारक और हिंदी में सुधारक नाम की अनियतकालिक पत्रिका निकालते थे। पत्रिका लेकर वह अखबार के दफ्तर में भी आते। तब अखबार के दफ्तर भी विचार-विमर्श का जिंदा केंद्र हुआ करते थे। काम के बीच भी इतनी गुंजाइश आसानी से निकल जाती कि न उनको अपना आना व्यर्थ की कवायद लगता और न हमें ऐसा लगता कि पंद्रह मिनट या आधा घंटा बेकार हो गया। हर बातचीत के बाद हम (जाहिर है उनके संपर्क में आने वाला और उनसे लाभान्वित होने वाला अपने दफ्तर में भी मैं अकेला तो नहीं था, कई साथी पत्रकार इस प्रक्रिया में शिद्दत से शामिल थे) ज्यादा समृद्ध महसूस करते हुए काम में जुटते। मगर साप्ताहिक अवकाश का दिन खास तौर पर उनके धरमपेठ स्थित मोहनी भवन में अड्डा जमाने का मौका हुआ करता था।

वे विवेकवाद के पुजारी थे। स्त्री पुरुष संबंधों में ही नहीं, मनुष्य और मनुष्य के बीच संबंधों में समानता को इतनी आसानी से और इतने सरल शब्दों में स्थापित कर देते कि हैरानी होती। दो प्रमुख सूत्र थे उनके कि पैसे को बीच से निकाल दीजिए और ईश्वर को बीच से निकाल दीजिए, फिर देखिए जीवन कितना सहज, सुंदर, सरल हो जाता है। इन दोनों की सत्ता हमारे मानने की वजह से है।

हमारा सारा दुनियावी कार्य व्यापार हमारे करने से होता है, पर हम मानते हैं कि हम पैसे के लिए कर रहे हैं, तो पैसा बीच में बना रहता है। फिर बहुत सारी बातें सिर्फ पैसा हासिल करने या हासिल न करने देने के लिए होने लगती हैं और मामला उलझता चला जाता है। पुलिस विभाग ही नहीं, अकाउंटेंसी और टैक्स बचाने, छुपाने और उसे पकड़ने की कवायद से जुड़ी कितनी ऊर्जा मनुष्य समाज इन बातों में लगा देता है सोचिए।

यही बात ईश्वर के साथ है। प्रकृति में इस ब्रह्मांड में शक्ति है इससे इनकार नहीं हो सकता। तरह-तरह की शक्तियां हैं, जो हम जानते हैं वे भी और जिन

शक्तियों को हम नहीं जानते, जिनके बारे में हमें आभास तक नहीं, ऐसी भी बहुतसी शक्तियां इस ब्रह्मांड में हैं। लेकिन वे सारी शक्तियां अपने नियम से चलती हैं, काम करती हैं। वे खास शख्स के इशारे पर, उसकी मर्जी से हमारा भला या बुरा नहीं करतीं।

हम मान लेते हैं कि यह सब ईश्वर की मर्जी से हो रहा है और फिर ईश्वर के बारे में जो हमारी कल्पना है उसे सच मानते हुए ऐसी-ऐसी उलझनें पैदा करते जाते हैं जिनका कोई ओर छोर नहीं रहता। इसी का एक नमूना आजकल दिख रहा है। गुजरात से शुरू हुआ तूफान देखिए कैसे हमारे आसपास के एक-एक शख्स को हिलाए हुए है (वह गोधरा कांड के बाद गुजरात में हुए दंगों के ठीक बाद का दौर था)।

मराठी भाषा और लिपि के वे अच्छे जानकार थे। उसे पढ़ने और सीखने के तरीकों पर उनका असाधारण काम है। ऐसे ही घर परिवार में पत्नी और बच्चों के साथ उनका व्यवहार भी अनजाने और अनचाहे ही देखने वालों को बहुत कुछ सिखा जाता। सचाई, ईमानदारी जैसे गुण उसकी बुनियाद में थे, यह तो बताने की जरूरत ही नहीं। वे पूरे खुलेपन से कहते प्यार जैसे भाव को किसी भी सीमा में नहीं बांधा जा सकता। किसी भी उम्र में और किसी भी उम्र के व्यक्ति के लिए ऐसा भाव आ सकता है।

उनके बारे में जितना भी बोलता चलूं शायद पूरा न हो। आज ही शाम को नागपुर से सुनील सोनी ने फोन पर, उनके गुजरने की सूचना दी। थोड़ा वक्त लगा इस सूचना के जज्ब होने में। और फिर अभी रात साढ़े बारह बजे जो भावनाएं उमड़ने लगीं तो रुकने का नाम नहीं ले रहीं। सुनील ने कल भी कोशिश की थी संपर्क करने की, किसी वजह से बात नहीं हो पाई। निधन कल ही हुआ। आज उनकी अंतिम इच्छा के मुताबिक उनका पार्थिव शरीर मेडिकल कॉलेज को सौंप कर अंतिम क्रिया संपन्न मान ली गई।

जी हां, वह जीवित रहते ही शरीर दान कर चुके थे। यह भी नागपुर की उन्नत चेतना परंपरा ही कहिए जिसका वे अंश थे और जिसे जिंदगी भर ही नहीं, उसके बाद भी आगे बढ़ाने का इंतजाम वे अपने जीते जी कर गए थे। सुनंदा जी और भरत समेत पूरे परिवार को मेरी संवेदना। उनकी स्मृतियों को सादर नमन।

---------------------------------------------

**Very Beautifully written, can't stop sharing**

**Salt -VS- Rice...**

If you were to cook 3 cups of rice,would you add 3 cups of salt to it ?

Certainly not!

So, in every preparation of rice, the rice always outnumbers the salt, yet a little salt makes a huge difference / impact in the overall outcome.

In the room in which you currently are, look up at the ceiling...

What is the size of the bulb compared to the size of the room ?

It is probably a ratio of 1:5000.

Yet, darkness flees the entire space once the small bulb is flipped on.

If I am the salt of the earth, and the light of the world, then "little me" has the ability to make big things happen..

Sometimes, because we feel outnumbered or overwhelmed at the sheer magnitude of evil or wrong-doers, we then choose powerlessness, and decide to go with the flow,not standing up for what we believe is right.

Little doesn't mean insignificant.

You are significant.

Your presence should make a BIG difference.

Stop waiting to be on the side of the majority.

They may be the majority, but they are the trivial majority,and you are the impactful minority.

They are the rice of the world,and you are the salt of the world..

They are the room and you are the light.

Make your influence felt!

Remember:

You are the world's seasoning, to make it beautiful...

So if we can just do the right seasoning to make even one life beautiful our life is worth living.

Onwards and Upwards !

Be the salt or the light.

– संकलन–शीला

--------------------------------------------------------------------

**शाखावृत्त –**

# आंतरराष्ट्रीय योगदिवस

**– कांचन बान्ते**

मातृ सेवा संघ, सीताबर्डी येथे बुधवार दिनांक २१ जून २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योगदिवस साजरा करण्यात आला. मातृ सेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी योगप्रशिक्षिका म्हणून लाभलेल्या सौ. ममता चिंचवडकर, सहसचिव, मातृ सेवा संघ यांनी उपस्थित सर्व महिला, कर्मचारी, प्रशिक्षणार्थी परिचारिका यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयुक्त अशी योगासने अतिशय सोप्या पद्धतीने प्रात्यक्षिकांद्वारे शिकविली. त्याचप्रमाणे ध्यान, योगा आणि प्राणायाम यांची योग्य सांगड घालून आपण आपले जीवन कसे सुखमय करू शकतो यांची माहिती सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. सीताबर्डी सूतिकागृहाच्या वैद्यकीय अधिक्षीका डॉ. पुष्पा भावे, नर्सिंग स्कूलच्या प्राचार्या श्रीमती कांचन बांते, स्नेहांगण शाळाप्रमुख श्रीमती मृणाली देशमुख, नर्सिंग स्कूलच्या प्रशिक्षणार्थी परिचारिका आणि मातृ सेवा संघातील कर्मचारी वर्ग या सर्वांनी योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचा लाभ घेतला.

-----------------------------------------

## कार्यक्रमाची त्रिवेणी

**डॉ. गीता व्ही दिक्षित**

परिचारिका दिवस मातृ सेवा संघाच्या संस्थापिका प. पू. कमलाताई होस्पेट जन्मदिवस आणि अशोक प्रसूति मंदिरच्या संरक्षिका कै. नलिनीताई दीक्षित यांचा जन्मदिन दि. १३ मे कार्यक्रमाची त्रिवेणी सौ. मंगला बुरंगे यांच्या अध्यक्षतेत साजरा करण्यात आला. सौ. मंगलाताईनी पू. कमलाताईच्या फोटोला माल्यार्पण केले. संस्थेचे संस्थापक म्हणजेच के श्री. डॉ. रामचंद्र गोपालराव दीक्षित के. श्री. डॉ. कृष्ण गंगाधरराव दीक्षित आणि के. डॉ. नलिनीताई दीक्षित यांच्या फोटोंना हार घालण्यात आले सर्व परिचारिकांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत केले.

डॉ. सौ. गीता दीक्षित यांनी कमलाताईचे ''कर्तव्य'' सतत कार्यरत राहून मातृ सेवा संघाची स्थापना विस्तार ते ''पंचवटीचा'' निर्माण अन्य प्रकल्प अशी जानकारी कर्मचाऱ्यांना सांगितली सर्वांना फार आवडली.

श्रीमती छाया भवालकर यांनी ''डॉक्टर काकूंची शिकवण'' म्हणजे ''एका खुल्या विद्यापीठात अध्ययन करणे'' असे सांगितले. कार्यक्रमात डॉ. श्री व्ही. के दीक्षित भे. अधीक्षक श्री. संजय दीक्षित कोषाध्यक्ष आणि सर्व कर्मचारी आणि इत्तर लोक उपस्थित होते. शाखाध्यक्षा सौ. मंगलाताईंनी उद्बोधन केले परिचारिकांना आर्शीवादपर मार्गदर्शन केले. सर्वांनी मिळून प्रार्थना केली स्वल्पाहार वितरणानंतर कार्यक्रमाची सांगता झाली

-----------------------------------------

Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966

## मातृसेवा संघ, सीताबर्डी, नागपूर

प्रमुख कार्यालय : उत्तर अंबाझरी मार्ग, सीताबर्डी, नागपूर – १०
दूरध्वनी ०७१२–२५२२२८७, ०७१२–२५२२३९३ / २५२३५९६

**कार्यक्षेत्र**

**– शाखा –**

१. सीताबर्डी, नागपूर २. महाल, नागपूर ३. वर्धा ४. भंडारा ५. आर्वी ६. जबलपूर ७. हिंगणघाट ८. ब्रह्मपुरी ९. बिलासपूर १०. वरोरा ११. चांदूररेल्वे १२. अकोला

**– सीताबर्डी सूतिकागृहांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सुविधा –**

बाह्यरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, बालरोग विभाग, अपूर्णकाल अर्भक विभाग, बृद्ध व स्त्रीरुग्णसेवा, कुटुंब कल्याण योजना, प्रसवपूर्व तपासणी, प्रसवोत्तर तपासणी, बालविकास चिकित्सा केन्द्र, पॅथॉलॉजी, सोनोग्राफी व कलर डॉपलर, पॅपस्मिअर टेस्ट (कॅन्सर निदान केन्द्र), कॉल्पोस्कोपी, एड्स, (आय.सी.टी.सी.टी.) प्रकल्प, मेमोग्राफी, संध्यादीप

**शैक्षणिक कार्यक्रम**

बहुउद्देशीय परिचारिका प्रशिक्षण केंद्र, सी.जी.ओ., डी.जी.ओ. –

**नागपुरातील प्रकल्प / प्रवृत्ती –**

* महिला व बाल कल्याण सीताबर्डी रुग्णालय आणि अनुसंधान संस्था, सीताबर्डी नागपूर ❊ सुधारित सहाय्यक परिचारिका प्रसविका प्रशिक्षण केंद्र ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, सीताबर्डी, नागपूर ❊ इन्स्टिटयूट ऑफ सोशलवर्क, बजाजनगर ❊ नंदनवन दुर्बलमनस्क मुलांची शाळा व संरक्षित कर्मशाळा, सीताबर्डी, नागपूर ❊ पंचवटी आश्रम ❊ मातृसेवा मासिक ❊ फाउंडलिंग होम, मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल ❊ मातृसेवा संघ सन्मित्र उपहारगृह ❊ कर्मचारी महिला वसतीगृह, बजाजनगर ❊ 'स्नेहांगण' अपंग मुलांची शाळा ❊ कौटुंबिक सेवा सल्ला केंद्र, बजाजनगर व मासेस समाजकार्य संस्था बजाजनगर ❊ विकलांग मुलांचे पुनर्वसन प्रकल्प ❊ कुसुम विहार ❊ मेमोग्राफी सेंटर

Regd. with the Registrar of Newspapers, New Delhi 11638/1966
**प्रकाशक :** अध्यक्ष/सचिव, मातृसेवा संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०
**अक्षर जुळवणी व मुद्रक :** श्री एन्टरप्राईजेस, सीताबर्डी, नागपूर – ४४००१२